PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 3, ISSUE 2

# महाराणी येसूबाई – व्यक्ती आणि कार्य

**प्रा. डॉ. विलास भा. फरकाडे**

प्रा. डॉ. विलास भा. फरकाडे
अमर कला व वाणिज्य महाविद्यालय
टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपूर
**महाराष्ट्र भारत**

## ABSTRACT

### प्रस्तावना –

मराठेशाहीत ज्या कर्तबगार स्त्रियांनी आपल्या गुणवत्तेच्या आणि कर्तबगारीच्या जोरावर मराठेशाही टिकून ठेवण्यात जे दैदिप्यमान यश मिळविले, त्या कर्तबगार स्त्रियांमध्ये राजमाता जिजाबाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर इ. स्त्रियांनी अतुलनीय कामगीरी केलेली आहे. या कर्तबगार स्त्रियांनी मराठा राज्यांचे रक्षण करण्यासाठी आणि अडचणीच्या प्रसंगी राज्यशासनाचा गाडा पुढे ओढण्यासाठी अथक प्रयत्न केले. परंतु पुरूषप्रधान इतिहास लेखन प्रवाहात या स्त्रियांचे कार्य आणि कर्तत्व बरेच दुर्लक्षित झाल्याचे दिसून येते. त्यादृष्टिने संभाजी महाराजांची पत्नी व शाहू महाराजांची माता महाराणी येसुबाईंच्या कार्य आणि कर्तृत्वावर या शोध निबंधातुन प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

### विषयाचे महत्त्व –

येसुबाईचे माहेर दाभोळ प्रांतातील शिर्के घराण्यातील असून शिर्के हे तेथील देशमुख होते. येसुबाईच्या पित्याचे नाव पिलाजी शिर्के असून येसुबाईचा जन्म इ.स. १६८९ मध्ये झाला. पिलाजी शिर्के यांनी स्वराज्याची सेवा पत्करल्यानंतर आपली कन्या जिऊबाई उर्फ येसुबाई ही संभाजी महाराजांना देऊन शिवाजी महाराजांशी आपले नातेसंबंध प्रस्थापित केले. तसेच शिवाजी महाराजांनी ही आपली कन्या राजकुंवरबाई येसुबाईचे बंधू गणोजीस देऊन हे नाते अधिक दृढ

केले. येसुबाईचे माहेरचे नाव जिऊबाई असुन विवाहानंतर सासरी जिऊबाईचे नाव येसुबाई उर्फ राजसबाई ठेवण्यात आले. संभाजी महाराजांशी येसुबाईचा विवाह सन १६६१ ते १६६५ च्या दरम्यान झाला असावा. विवाहानंतर येसुबाईला मातोश्री जिजाबाईचा प्रेमळ सहवास लाभला. जिजाबाईच्या मार्गदर्शनाखाली गृहशिक्षणा पासुन ते राजनीतीपर्यंतचे सर्व धडे येसुबाईला मिळाले. मराठी राज्याची भावी महाराणी म्हणून जिजाबाईने येसुबाईच्या शिक्षणात कोणतीच कसर ठेवली नाही. पूढील आयुष्यात निरनिराळयाप्रसंगी व संकटसमयीचे धाडस, चातुर्य, स्वराज्याबद्दल प्रेम, निष्ठा, आप्तस्वकीयांबद्दल जिव्हाळा वेळोवेळी येसुबाईमध्ये दिसून आला. त्या सर्वांमागे जिजाबाईंचे संस्कार होते. येसुबाई लहानअसतांनाच राजमाता जिजाबाईच्या सहवासात असल्याने मोहिमा, स्वराज्याबद्दल आपूलकी, स्वराज्य इ. गुण त्यांच्या अंगी भिनले होते. जिजाबाईसोबतच येसुबाईंना शिवाजी महाराजांचे देखील योग्य मार्गदर्शन लाभले. संभाजी आणि येसुबाई यांच्या विवाहामुळे शिर्के आणि भोसले हि दोन मातब्बर घराणी एकत्र आली. या दोन्ही घराण्यांचे अनुवांशिक संस्कार येसुबाईवर लहानपणीच झाल्याने त्या सुसंस्कृत, कर्तृत्ववान आणि सुविद्य बनल्या.

मातोश्री जिजाबाईच्या देखरेखीखाली मराठी राज्याची जडणघडण होत असतांना शिवछत्रपतींच्या राजकारणांचे आणि राजनीतीचे डावपेच अगदी जवळून पाहण्याची संधी येसूबाईंना मिळाली आणि याच संधीचा उपयोग त्यांनी आपल्या भावी आयुष्यात करुन घेतला. शिवाजी महाराजांचा आपल्या सुनेवर अत्यंत गाढा विश्वास होता. आपल्या उग्र प्रवृत्तीच्या मुलास सुमार्ग दाखविणारी शक्ती म्हणुन शिवाजी महाराज त्यांच्याकडे विश्वासाने पाहत असत. एकेप्रसंगी शिवाजी महाराज म्हणाले,“ मी पून्हा सौभाग्यवती येसूबाईंच्या पोटी शिवनामे जलम घेऊन इच्छा पूर्ण करीन”. यावरुन शिवाजी महाराजांच्या आपल्या सुनेवरील प्रेमाचा प्रत्यय येतो. संभाजी महाराज जरी तापट स्वभावाचे असले तरी, त्यांनी आपल्या वागण्याने येसुबाईंना कधीच दु:ख दिले नाही. येसुबाई सातत्याने संभाजी महाराजांसोबत स्वारीत असत. तसेच संभाजी महाराजांच्या सहवासामुळे धैर्य, त्याग इ. गुण त्यांच्या अंगी आले. शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकानंतर नव्या मराठी राज्यांची ‘पहिली युवराज्ञी’ म्हणुन येसुबाईंना राजघराण्यात स्थान प्राप्त झाले. पण, या राजवैभवाबरोबर आलेल्या संकटांनाही त्यांना सामोरे जावे लागले. जिजाबाईच्या मृत्यूनंतर राजकुटुंबात गृहकलहास आरंभ झाला. त्यातून संभाजीने मुघलांशी हातमिळवणी करुन ते दिलेरखानास जाऊन मिळाले. हे वैयक्तीकरित्या येसुबाईवर फार मोठे संकट होते. यावेळी त्या गरोदर असून त्यांचा मुक्काम शृंगारपूरला होता. २९ जाने. १६७९

रोजी येसुबाईला मुलगी झाली. तिचे नाव भवानीबाई ठेवण्यात आले. ही भवानीबाई शंकराजी महाडोक यास दिली होती.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्याच्या कारभाराची सर्वसुत्रे सोयराबाईने आपल्या हाती घेऊन राजारामाला गादीवर बसवण्याचा कट रचला. या कटात अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी वगैरे प्रमुख अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे निदर्शनास येताच संभाजीने त्यांना देहांताची शिक्षा दिली. यावेळी येसुबाई या अपराधी लोकांना वाचवू शकल्या नाहीत. परंतू मोठया धिराने या कृत्यांपासून त्यांनी संभाजीराजांना परावृत्त करण्याचे प्रयतन केले. संयमी येसुबाई शिवाजी महाराजांच्या काळातील प्रशासनाविषयक प्रथा व नियम पाळून राज्यसंवर्धनाबाबत अतिशय दक्ष व जागृत असल्याचे दिसून येते. येसुबाईंनी संभाजीच्या तापट स्वभावाने घडणाऱ्या अनेक घटनांना अतिशय कुशलतेने प्रतिबंध घातला. संभाजी महाराजांना आपली चुक ध्यानात आल्यानंतर त्यांनी बाळाजी आवजीच्या दोन मुलांच्या जबाबदारीचे काम येसुबाईंवर सोपविले. येसुबाईंनी प्रेमाने या दोघांचे पालन करुन त्यांच्याकडून शिक्के बनविने, कागदपत्रे, चिठ्ठी लिहिने ही कामे करुन घेतली. राज्याभिषेक प्रसंगी संभाजी महाराजांनी आपल्या सरकारकुनांना क्षमा करुन पूर्ववत त्यांच्या पदावर रुजू करुन घेतले. याबाबतीत संभाजीचे मन येसुबाईंनीच वळविले होते. येसुबाईंनी आपल्या पतीच्या स्वभावाचा चांगलाच अभ्यास केला होता. मराठी राज्याच्या संरक्षणाकरीता आपल्या माहेरचा देखील अंत:स्थ पाठिंबा त्यांनी मिळविला होता. आपल्या सुस्वभावामुळे आणि राज्याची जाण असल्यामुळे प्रत्येकाचा विश्वास संपादन करुन घेण्यास व राज्याची घडी पुर्वपत बसविण्यात येसुबाईंनी प्रयत्नांची पराकष्टा केली. येसुबाई या पराकोटीच्या संयमी होत्या. संभाजी महाराजांचा त्यांच्या कर्तृत्वावर प्रगाढ विश्वास होता. रागाच्या भरात आपल्या हातून भलतीसलती कृत्ये होऊ नये म्हणून राजमुद्रेचा अधिकार त्यांनी आपली पत्नी येसुबाईंच्या हाती दिला. संभाजीच्या पत्रामध्ये संभाजीशिवाय येसुबाईंची मुद्रा असल्याचे दिसून येते. 'श्री सखी राज्ञी जयति' अशी येसुबाईंची मुद्रा होती. यावरुन राज्यकारभारात येसुबाईंचा सहभाग मोठा असल्याचे दिसून येते. राज्याभिषेकानंतर संभाजी महाराजांना सतत युध्दमोहिमेवर जावे लागे. त्यामुळे आपल्या गैरहजरीत स्वराज्याचा कारभार संभाजी महाराज येसुबाईंकडे सोपवित असे. संभाजी महाराजांच्या गैरहजेरीत येसुबाई जातीने आणि अधिकाराने राज्यकारभार चालवित असे.

औरंगजेब बादशहा स्वराज्याचा बिमोड करण्यासाठी महाराष्ट्रात उतरल्यामुळे संभाजीला आपले सर्व लक्ष शत्रुंवर केंद्रित करावे लागले. तेव्हा महाराणी येसुबाईंकडे सर्व अंतर्गत कारभार

सोपवून संभाजी मुघलांच्या प्रतिकारासाठी सज्ज झाले. गो.स.सरदेसाई म्हणतात,''इतका तिच्या कर्तृत्वावर त्याचा विश्वास होती की, राज्यातील कोणताही हुकुम येसुबाईच्या नजरेस गेल्याखेरीज सुटत नसे'' यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, येसुबाई कामाच्या बाबतीत अतिशय दक्ष होत्या. छत्रपतींच्या अनुपस्थितीत महाराणी येसुबाईने काढलेल्या हुकूमामध्ये 'आज्ञा' या शब्दाऐवजी 'छत्रपतींची राजआज्ञा' अशी शब्दयोजना राहत असे.

संभाजीने मोठया सन्मानाने येसुबाईंना 'श्री सखी राज्ञी जयति' असा शिक्का दिला होता. तो त्या कौलनामा, अभयपत्रे वगैरेंवर वापरत असे. त्यांच्या पत्राचा मायनाही ''ई कौलनामे सौभाग्यवती राजश्री बाईसाहेब दामदौलतु...... '' असा असे. ज्यावेळी महाराणी म्हणून त्या हुकूम काढत, त्यावेळेस ''अज रख्तखाने सौ. येसुबाई'' असे लिहित असत. राजधानीत संभाजीच्या अनुपस्थितीत सर्वत्र बातम्या राखणे, गुन्हेगारांची वासलात लावणे, कैदेत दक्षता राखून ठेवणे हा कारभार येसुबाईंना जातीने करावा लागे. मुलकी कारभार त्यांच्या स्वतंत्र शिक्काने चाले व त्यावर 'सखी राज्ञी, सचिव' असा त्या स्वतंत्र शिक्का वापरत असत. सर्व अंतर्गत व्यवस्थेचा राज्यकारभार त्यांच्यावर टाकल्यामुळे राज्यकारभारातील संशयित वातावरणाची संभाजीराजांना विशेष फिकीर करण्याचे कारण नव्हते. सरकारकुनांच्या निष्ठेवर अवलंबून राहण्यापेक्षा संभाजीराजांनी आपल्या मुलकी कारभाराची जबाबदारी येसुबाईंवर सोपवून योग्यच निर्णय घेतला होता. येसुबाईंनी शेवटपर्यंत आपल्या स्वभावाने सर्व राजमंडळावर आपली छाप पाडली. त्यामुळे सर्वांना त्यांच्याबद्दल आदर वाटत असे. काव्यालंकार, शास्त्रे, पूराणे, संगीत, धनुर्विद्या यामध्ये येसुबाई प्रविण होत्या. संभाजीच्या कारकिर्दीत सैन्यापासून देव–देवस्थानाला काहीही उपद्रव होऊ नये, याची योग्य ती काळजी येसुबाईंनी घेतली.

राज्यात येताच संभाजीने राजाराम आणि त्याची पत्नी ताराबाई यांना नजरकैदेत ठेवले होते. पण येसुबाईंनी आपल्या दिरावर मायेची पाखर घातली. संभाजीच्या तापट स्वभावाची झळ त्यांना पोहचवू दिली नाही. राजारामाने नेहमी येसुबाईंना मातेसमान मान दिला. येसुबाईंनी बाहेरच्या लोकांशी राजारामाचा संपर्क वाढू दिला नाही. इ.स.१६८९ मध्ये संगमेश्वर येथे संभाजी राजे मोगलांच्या कैदेत सापडले. आपल्या पतीच्या कैदेची बातमी ऐकून येसुबाईंवर ब्रम्हांड कोसळले. त्यांच्यावर प्रचंड आघात झाला. संभाजी राजांच्या छळाच्या बातम्या रोज रायगडावर येत. त्या बातम्या ऐकून येसुबाईंना मरणप्राय यातना होत असत. स्वत:वर दु:खाचा डोंगर आला असला तरी, त्यांनी आपले दु:ख बाजूला सारुन प्रथम आपले मन घट्ट केले आणि स्वराज्य संरक्षण हेच आता आपले जिवितकार्य मानून मराठयांमध्ये मनोधैर्य वाढविण्यास सुरुवात केली.

११ मार्च १६८९ रोजी वढू येथे संभाजी राजांची हत्या झाली. पुढे वढू याठिकाणी येसुबाई व शाहू यांनी संभाजीचे वृंदावन बांधले व त्यांच्या पुजेअर्चेसाठी नैवेद्य, नंदादिप, बाग करुन तुळशी लावण्यासाठी भिकाराम गोसावी व वासुदेव भट यांना इनाम जमीन दिली. संभाजीच्या हत्येनंतर गादीवर वारस नेमने आवश्यक होते. यासाठी येसुबाईकडे दोन पर्याय होते. एक म्हणजे आपला मुलगा शाहू याचे मंचकारोहण करणे किंवा आपला दिर राजाराम यास गादीवर बसविणे. कोणत्याही सर्वसाधारण स्त्रीने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर आपल्या मुलाचा फायदा पाहिला असता. परंतू येसूबाईंनी आपल्या पुत्राच्या ऐवजी आपल्या दिरास गादिवर बसवण्याचा उदार निर्णय घेतला. रायगडावर येसुबाईच्या सल्लयाने मसलत झाली व सरदारांनी ठरविले की, जोपर्यंत शाहू प्रौढ होत नाही. तोपर्यंत राजारामास धनी करावा. महाराणी येसुबाईंनी अत्यंत धिरोदात्तपणे सर्व मराठा मंडळासमोर निस्वार्थीपणाचा एक आदर्श घालवून दिला आणि स्वत: पुढे होऊन राजारामाचे मंचकारोहण केले. येसुबाईंनी रायगडावर सर्व मंत्रीमंडळींना एकत्र बोलावून त्यांच्याकडून स्वराज्य रक्षणाच्या शपथा घेतल्या. या त्यांच्या स्वार्थत्यागामुळे सर्व मराठा सरदार प्रेमाणे एकत्र आले आणि येसुबाईच्या मार्गदर्शनाखाली औरंगजेबाविरुद्‌ध लढण्यास तयार झाले. यापूर्वीच रायगडाला झुल्फिकारखानाचा वेढा पडला होता. अशा कठिणप्रसंगी येसुबाईंनी एक असा निर्णय घेतला की, स्वराज्य राखायचे असेल तर छत्रपती सुरक्षित राहीला पाहिजे. म्हणून राजारामाने सरदारांसह व कुटुंबासह बाहेर पडून कर्नाटकात जिंजीकडे जाऊन मराठयांचा ध्वज अभंग राखावा. तिकडे सुरक्षित पोहचल्यावर आम्हाला गुप्तपणे तिकडे घेवून जावे. आम्हास मुलास घेवून राहण्यास योग्य जागा रायगडाखेरीज नाही. अशाप्रकारे स्वराज्याच्या रक्षणासाठी आपले व आपल्या पुत्राचे भविष्य महत्त्वाचे न मानता अत्यंत औदार्याने, उदात्तपणे येसुबाईंनी ही मसलत केली. त्यांनी समतोलपणे विचार करुन राजारामास बाहेर पडण्याचा सल्ला दिल्यामुळे सर्व राजकुटुंबच शत्रुच्या ताब्यात जाण्याचा धोका टाळला. शाहू रायगडावर आहे हे औरंगजेबाला कळताच त्यांने झुल्फिकारखानाला रायगडावर पाठविले व त्यांने किल्ल्याला वेढा दिला. बाहेरिल सहकार्याशिवाय किल्ला अधिक काळ लढविणे शक्य नव्हते. तरीही येसुबाईंनी आठ महिने किल्ला लढविला. राजाराम खटपट करुन काहीतरी मदत करेल, अशी येसूबाईंना आशा होती. परंतू शेवटी हतबल होऊन येसुबाईंने रायगड मोगलांच्या ताब्यात दिला. येसुबाई व शाहू आणि इतर मंडळी यांना झुल्फिकारखानाने कैद करुन मुगल छावणीत नेते. रायगड आठ महिने लढवून मुघलांशी सन्माननीय वाटाघाटी करण्यात जो पुढाकार घेतला तो साहजिकच शिवाजी महाराजांच्या सुनेस शोभणारा होता. औरंगजेबाने संभाजी महाराजांना अमानुषपणे ठार मारले असले तरी, त्यांच्या राणीस व पुत्रास सन्मानाने वागविले.

औरंगजेबाची मुलगी झिनतउन्नीसा शाहूवर पुत्रवत प्रेम करी. येसुबाईच्या पावित्र्याचा प्रत्यक्ष औरंगजेबावर इतका परिणाम झाला की, त्याने त्यांची कधीही अप्रतिष्ठा केली नाही. औरंगजेबाने शाहूस 'राजा' ही पदवी बहाल करुन सातहजारी मनसबदारी दिली. त्यासाठी गुजरात व खान्देश असे दोन सुभे देऊन येसुबाईना हा कारभार पाहण्याकरीता अधिकार दिला. जहागिरीचा कारभार पाहण्याकरीता ''येसूबाई वालिद ए शाहू राजह सने आहद'' असा इ.स. १७०७ मधला शिक्का कागदपत्रांवर आढळून येतो. कैदेत असतांनाच औरंगजेबाने शाहूचे दोन विवाह लावून दिले. औरंगजेबास नव वधू पाहण्याची इच्छा झाली. परंतू मराठी स्त्रीयांना पडदा असल्यामुळे बादशहापूढे येणे रितीला धरुन नव्हते. ही वेळ येसुबाईच्या कसोटीची होती. तिने एका दासिला दागदागिणे घालवून शाहूसोबत बादशहाकडे पाठविले. हिच ती वीरुबाई होय, ती पत्नी म्हणून अखेरपर्यंत शाहूसोबत राहीली. बादशहाने त्या दोघांना आशिर्वाद दिला. कैदेत असुनही येसूबाईचे संपूर्ण लक्ष आपल्या स्वराज्यात होते. त्याही पलीकडे संपूर्ण लक्ष राजाराम महाराजांकडे होते. तिने एका पत्रातून राजारामाला सुचना केली की, त्यांच्या बायकांना त्याने जिंजीहून विशालगडास पाठवावे. मराठयांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी औरंगजेब २६ वर्ष झगडला. पण १७०७ मध्ये त्याचे निधन झाले. औरंगजेबाचा पूत्र आझमशहा याने स्वत:ला बादशहा घोषित केले. त्यानेही येसूबाई आणि शाहू व इतर राजबंद्यांची सुटका केली नाही. त्यामुळे येसुबाई आणि शाहू प्रचंड अस्वस्थ होते. सुटकेसाठी त्यांनी मोघल छावणीतील झिनतउन्नीसा बेगम, झुल्फिकारखान व राजपूत राजे यांच्यामार्फत बादशहाकडे अर्जी सुरु केल्या. परिणामी भोपाळ जवळील मुक्कामात शाहुची मुक्तता करण्यात आली. पण पुढे दक्षिणेत गेल्यावर मुघलांविरुध्द शाहू काही गरबड करु नये. म्हणून येसुबाई व इतर राजबंदयांना ओलीस म्हणून कैदेतच ठेवले. आपली नसली तरी, आपल्या पुत्राची कैदेतून सुटका झाली. याचे येसुबाईला समाधान वाटले.

राजारामच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी ताराबाई हिने मोगलांशी लढा दिला व आपला पुत्र शिवाजी याला गादीवर बसवून ती स्वत: राज्यकारभार पाहू लागली. शाहूला मराठी गादीचा वारस मानायला ताराबाई तयार नव्हती. इकडे शाहूने मराठा सरदारांना आपल्याकडे वळवून ताराबाईशी युध्द पुकारले. खेडच्या लढाईत शाहूने ताराबाईचा पराभव करुन स्वत:चा राज्यभिषेक करवून घेतला. शाहू मराठयांचा छत्रपती बनला. यावेळी येसुबाई मात्र, महाराष्ट्रापासून ब-याच दूर उत्तरेच्या वाटेवर मोगलांच्या कैदेत होत्या. छत्रपती शाहूला आपल्या मातेच्या सुटकेविषयी एकसारखी तळमळ लागली. दिल्लीवर स्वारी करुन मातेची सुटका करण्याइतके सामर्थ्य

शाहुजवळ नव्हते. परंतू ती संधी इ.स.१७१८ मध्ये त्यांना चालून आली. दिल्लीचा बादशहा फरुखशियरच्या विरोधात शाहुने दक्षिणेतील मोगल सुभेदार सय्यद हुसेनअली याला लष्करी मदत दिली. सय्यद हुसेनअलीबरोबर शाहुच्या झालेल्या तहानुसार दिल्लीच्या गादीवरुन फरुखशियरला पदच्यूत केल्यानंतर नव्या सनदांसोबत येसुबाई व इतर राजबंद्यांची मुक्तता केली. ४ जुलै १७१९ रोजी महाराणी येसूबाई मराठयांची राजधानी साताऱ्यास पोहचल्या. मातोश्रींचे आगमन होत आहे. हे समजताच शाहू राजे सातारा गडावरुन उतरुन कित्येक कोस त्यांच्या भेटीस पूढे आले. तब्बल एका तपानंतर मातापुत्र एकमेकांस भेटले. मराठयांच्या इतिहासातील हा एक मोठा मंगलक्षण होता. सन १६८९ ते १७१९ एवढा तीस वर्षाचा दिर्घकाळ या दुर्दैवी महाराणीला बंदिवासात काढावा लागला. बंदिवासातल्या खडतर जीवनालादेखील त्यांनी अत्यंत धैर्याने तोंड दिले. उर्वरित काळ त्यांनी सुखाने घालविला. येसुबाई स्वराज्यात दाखल झाल्या. त्यावेळी त्यांचे वय ६० वर्षाचे होते. पण या वयातही त्यांनी शाहुच्या कारकिर्दीतही काही न्यायनिवाडयांची कार्य केलीत. छत्रपती शाहूने आपल्या मातेला अत्यंत मानाने वागविले. येसुबाईंनी आपल्या उर्वरित काळात मुक्तहस्ताने दानधर्म केला व ईश्वरचिंतनात आपले मन एकाग्र केले. राजकारणातुन त्या निवृत्त झाल्या असल्या तरीही काही राजकारणप्रसंगी त्या आपल्या मुलाशी सल्लामसलत करीत असे. जीवनामध्ये अनेक चढउतार पाहिलेल्या आणि राजकारणातील संघर्षात संपूर्ण जीवन होरपळून निघालेल्या या मराठयांच्या महाराणीच्या जीवनाची अखेर मात्र अत्यंत समाधानी अवस्थेत गेली. इ.स. १७३० मध्ये महाराणी येसुबाईचा मृत्यू झाला. येसुबाईच्या मृत्यूनंतरचा दहनविधी संगममाहुली येथे करण्यात आला. माहुली संगमावर महाराणी येसूबाईंचे वृंदावन बांधण्यात आले. शाहू महाराज तेथे नित्य दर्शनास जात असे. त्यांनी वृंदावनाच्या पुजा व्यवस्थेसाठी योग्य तजविज करुन ठेवली. मराठयांच्या इतिहासात महाराणी येसुबाईंचे कार्य हे अत्यंत महनीय मानावे लागेल.

## निष्कर्ष –

१. महाराणी येसुबाई हया विविध क्षेत्रातील विविधांगी भुमिका बजावतांना आप्तसंबंधीयांबाबतही अत्यंत सौम्य, प्रेमळ व उदार विचारांच्या पुरस्कार करणाऱ्या होत्या.

२. महाराणी येसुबाईंची मराठयांच्या राजकारणातील भुमिका अत्यंत उदारतेची असुन त्यांची तुलना राजमाता जिजाबाईंशी केली जावू शकते.

३. वीरस्नुषा, वीरपत्नी, वीरमाता, स्वराज्य रक्षक या नात्याने महाराणी येसुबाईंचे कर्तुत्व थोर आहे.
४. महाराणी येसुबाईंच्या चार्तुयातुन मराठा स्वराज्याचा बचाव झाला. त्यांच्या त्यागी भुमिकेतूनच हे शक्य झाले.
५. मराठा स्वराज्याचे मराठा साम्राज्यात परिवर्तन झाले, त्याचे संपूर्ण श्रेय महाराणी येसुबाईंना जाते.

## संदर्भ ग्रंथसुची –

१. गोखले, डॉ. कमल – शिवपूत्र संभाजी, ज्ञानविज्ञान विकास मंडळ पुणे, १९७१
२. पवार, डॉ. जयसिंगराव – छत्रपती संभाजी स्मारकग्रंथ, मंजुश्री प्रकाशक कोल्हापूर, १९९०
३. सरदेसाई माया – महाराष्ट्र सौदामिनी, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, १९६८
४. पवार, डॉ. जयसिंगराव – महाराणी ताराबाई – ताराराणी विद्यापीठ कोल्हापूर, १९७५
५. आपटे, द. वि. (संपा.) – महाराष्ट्र इतिहास मंजिरी, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९२३
६. बेंद्रे, वा. सि. – संभाजी महाराज यांचे चरित्र, पी. पी. एच. बुक स्टॉल मुंबई, १९७१
७. देशमुख, शारदा – शिवकालीन व पेशवेकालीन स्त्री जीवन – टिळक महाराष्ट्र विद्यापीठ प्रकाशन, १९७३
८. व्हटकर, डॉ. ज्योती – मराठा व पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्रिया, दिलीपराज प्रकाशन पूणे.